5565

जावक नं.    /२०२३
खडकी पोलीस स्टेशन पुणे.
दिनांक ०९/०९/२०२३

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
यांना सविनय सादर

प्रतिवेदकः- शामल पाटील, पोलीस उपनिरिक्षक, खडकी पोलीस स्टेशन, पुणे .

विषय - बेवारस मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध होणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, खडकी पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि. नं. ४३/२०२३ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दि. ०५/०९/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. दाखल अकस्मात मयता मधील मयत इसम नामे अनिल जाधव, वय ६० वर्षे, रा. केंद्रिय विदयालय जवळ, सेंकेड्री शाळे शेजारील शेड, रेजहिल्स, खडकी पुणे यांच्यावर दि. ०१/०९/२०२३ रोजी पासून ससून हॉस्पीटल पुणे येथे उपचार चालू असतांना दि. ०५/०९/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा मयत झाले आहे. ससून हॉस्पिटल एम.एल.पी.एम.नं. ५२९१/२०२३ अन्वये मयताचे मरणाचे कारण **Bilateral pulmonary consolidation** ने मरण आल्याचे अँडव्हॉन्स प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.
सदर मयत पुरुष इसमाचे वर्णन खालील प्रमाणे



एक बेवारस पुरुष अनिल जाधव, वय ६० वर्षे , रंगाने – गहु वर्णीय, अंगाने सडपातळ , कपाळ - मोठे, नाक मोठे व सरळ, डोक्याचे केस पांढरे, उंची ५-५, दाढी-मिशी वाढलेली पांढरी, डोळे- अर्धवट उघडे, दात पुढील ३ दात पडलेले, मौल्यवान वस्तु काही नाही.

तरी वरील वर्णनाचे बेवारस मयत इसमाचे नातेवाईकांचा शोध होणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

मा.सादर व्हावे.
दि. ०९/०९/२०२३

(शामल पाटील)
पोलीस उपनिरिक्षक
खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

मार्फत,

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, खडकी पो. स्टे. पुणे शहर

ठाणे अंमलदार
खडकी पोलीस ठाणे, पुणे शहर